27

# “द्रारिद्रय निर्मूलन - गरज समाज सहभागाची”

प्रा. डॉ. दुर्गादास डी. चौधरी
विभागप्रमुख - अर्थशास्त्र विभाग
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

**भा**रताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी गरीबी ही भारताची अग्रभागी समस्या आहे हे सांगताना विकास हे स्वत: ध्येय नाही तर द्रारिद्रय व उपासमार दुर करणे लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा पुर्ण करून जीवन स्तर उच्चतम करण्याचा प्रयत्न करणे हे ध्येय आहे. व हे ध्येय पूर्ण करण्यासाठी विकास हे साधन आहे असे सांगितले. थोडक्यात २०२० मध्ये भारताला जागतीक महासत्ता बनायचे असेल तर सर्वंकष विकास महत्वाचा आहे व तो द्रारिद्रय निर्मूलनानेच होऊ शकतो. परंतु केवळ शासकिय योजनांच्या माध्यमातुन अथवा सहानभूतीतून द्रारिद्रय निर्मुलन होणार नाही तर त्यासाठी समाज सहभागाची गरज आहे.

दारिद्रय संदर्भात अभ्यास करताना दोन दृष्टिकोण अढळतात. विकसित राष्ट्रांचा सापेक्ष दृष्टीकोण तर अविकसित व विकसनशिल राष्ट्रांचा निरपेक्ष दृष्टिकोण, भारतामध्ये द्रारिद्रयाचे अवलोकन करीत असताना निरपेक्ष दृष्टिकोणातून अवलोकन केले जाते. भारतामध्ये द्रारिद्रयरेषा निश्चित करताना उष्मांक सेवन हा मुख्य निकष मानला गेलेला आहे. साधारणपणे ग्रामीण क्षेत्रात २४०० उष्मांक प्रतिदिन प्रतिव्यक्ती तर शहरी भागात २१०० उष्मांक प्रतिदिन प्रतिव्यक्ती आवश्यक मानले गेलेले आहे.

भारतात दारिद्रय संख्येच्या संदर्भात वेगवेगळ्या अभ्यास गटांनी व तज्ञांनी द्रारिद्रयाचे मापन वेगवेगळया निकषाच्या आधारे केलेले आहे. अलिकडल्या काळामध्ये तेंडूलकर समितीने १९/०३/२०१२ ला गरीबी रेषेची संकल्पना मांडताना प्रतिव्यक्ती उष्मांक सेवन निकषापेक्षा प्रतिव्यक्ती मासिक उपभोग खर्च लक्षात घेतला आहे. प्रतिव्यक्ती किमान मासिक खर्च शहरी व ग्रामीण भागात तसेच राज्या राज्या नुसार भिन्न असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांच्या आकडेवारी नुसार अखिलभारतीय स्तरावर ग्रामीणभागात ६७२.८ रूपये प्रति महीना व शहरी भागात ८५९.६ रूपये प्रतिव्यक्ती प्रतिमहीना खर्च करण्याची ज्यांची क्षमता नाही ते द्रारिद्रय रेषेखाली आहे. असे सांगीतले.

या निकषाच्या आधारे भारतात नागालँड मध्ये किमान उपभोग खर्च सर्वाधिक आढळतो, तो शहरी भागात ११४७.६ रूपये, ग्रामीण भागात १०१६.८ रूपये तर सर्वात कमी किमान उपभोग खर्च ओरीसा मध्ये शहरी भागात ७३६ रूपये तर ग्रामीण भागात ५६७.१ रूपये येत असल्याचे सांगितले. महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये दारिद्रयरेषेसाठी शहरी भागात प्रतिव्यक्ती प्रतिमहीना ७७१.७ रूपये तर ग्रामीण भागात ७४३.७ रूपये सांगितलेला आहे. या आधारावर तेंडूलकर समितीने भारतातील दारिद्रयाचे मापन करताना इस. २००४-०५ मध्ये ३७.२ % लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती इस. २००९-१० मध्ये ती २९.०८% झाली. म्हणजेच तेंडूलकर समितीने वरिल निकषाच्या आधारे भारतातील दारिद्रयाची संख्या २००४-०५ च्या तुलनेमध्ये २००९-१० मध्ये ८.४२ % कमी झाल्याचे सांगितले. अर्थात तेंडूलकर समितीने सांगितलेल्या निकषाच्या आधारे केलेले दारिद्रयाचे मोजमाप व येणारा किमान उपभोग खर्च यावर बरीच सर्वस्तरातून टिका झालेली आहे. यासंदर्भात दारिद्रयाची पातळी निश्चित करण्यासाठी शासनाने रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केलेली आहे.

अर्थात दारिद्रय रेषा निर्धारनामध्ये निकषाच्या बाबतीमध्ये वाद आहेत. अलीकडल्या काळामध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर गरीबी संख्या निर्धारनासाठी बहुआयामी निर्धनता निर्देशांक (एम. पी. एल.) निकष समोर आलेला आहे.

बहुआयामी निर्धनता निर्देशांक तीन मुख्य वैशिष्टयांवर आधारित आहे. १. आरोग्य २. शिक्षण ३. राहानीमान हे ते तीन वैशिष्ट्य होय. आरोग्य या निकषामध्ये बालमृत्यु प्रमाण, पोषन यांना मुख्य स्थान आहे. शिक्षण या निकषामध्ये प्राथमिक शिक्षणापासून वंचित व

शालेय उपस्थिती पासून वंचितांची संख्या अभिप्रेत आहे. तर जीवनस्तर या निकषामध्ये वीज, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, पक्के घर, मनोरंजन साधने, वाहतूक साधने, फ्रिज या बाबींच्या उपभोगाचा समावेश केलेला आहे.

यातील प्रत्येक निकषास स्वतःचे महत्व आहे. या बाबींनी युक्त अथवा यापैकी किमान बाबीपूर्ण असने म्हणजे तो दारिद्रयात नाही असे समजले जाईल अर्थात भारतामध्ये २०११ च्या जनगणने मध्ये तसेच सामाजिक व आर्थिक सर्वेक्षनामध्ये या बाबींना महत्व देण्यात आलेले आहे. व या अधारावरच दारिद्रयाचे मोजमाप व दारिद्रयाची संख्या ग्रहीत धरावी हा विचार प्रवाह प्रबळ होत आहे.

म्हणजेच थोडक्यात केवळ उपभोग खर्चाला अथवा उष्मांक सेवनाला मूख्य निकष न मानता आरोग्य, शिक्षण , राहनीमाण हे मानव विकासाचे महत्वाचे निकष दारिद्रयरेषा निश्चित करण्यासाठी आवश्यक मानले गेले पाहीजेत. याचा आग्रह डॉ. अमर्त्यसेन सारख्या विचारवंतांनी व्यक्त केलेला आहे.

भारतामध्ये दारिद्रय निर्मूलनासाठी शासकिय पातळीवर वेगवेगळया पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून, अर्थसंकल्पाच्या माध्यमातून अनेक योजना घोषित झालेल्या आहेत. गरीबी हटाव पासुन ते अन्न सुरक्षा कायद्यापर्यंत दारिद्रय निर्मूलनयोजना सर्वज्ञात आहे. परंतु असे असलेतरी आजही दारिद्रयाच्या समस्येची तिवृता कमी झालेली नाही. केवळ योजनांच्या द्वारे, वित्तीय व मौद्रिक धोरनांच्या द्वारे वेगवेगळे अनुदान व सवलती देऊन दारिद्रय निर्मूलनास यश आलेले नाही. याची मिमांसा करताना जनतेच्या प्रबोधनाकडे व दारिद्रय निर्मूलनाच्या प्रक्रियेत समाज सहभागाची असलेली न्युनता प्रकर्षाने महत्वाचं कारण म्हणून पुढे येते. म्हणूनच जर भारतामध्ये दारिद्रयाचे ख-या अर्थाने निर्मूलन करवयाचे असेल तर समाज सहभागाला प्रेरीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील मार्ग अनुसरता येतात.

१. गावातील दारिद्रयरेषेखालील असलेल्या विधिग्राह्य यादीचे जाहीर प्रगटन करणे.

२. स्थानिक वर्तमान पत्रात दारिद्रय यादी प्रसिध्द करणे व आक्षेप मागवणे.

३. यादीतील नावांवर आक्षेप घेण्यासाठी निनावी तक्रार विचारात घ्यावी.

४. आलेल्या तक्रारीचे जाहीर प्रगटन करावे. तसेच तक्रारीच्या कार्यवाहीचे कारणासह प्रगटन करावे.

५. दारिद्रयरेषेखालील कुटूंबाची यादी करताना सर्वेक्षण करणारे, स्थानिक प्रशासकिय अधिकारी (ग्रामसेवक / तलाठी), स्थानिक लोकप्रतिनीधी (संबधित वार्डचा ग्रामपंचायत सदस्य / नगरसेवक) यांना जबाबदार धरावे.

६. यादीमध्ये हेतूपूरस्सर चूक अढळून आल्यास संबधित प्रशासकिय अधिकारी व लोक प्रतिनीधींना तात्काळ दंडनिय कार्यवाही करावी.

७. समाजातील लोकांनी दारिद्रययादीचे अवलोकन करून केवळ दारिद्रय निकषात बसणा-या व्यंक्तींचा अथवा कुटूंबांचा समावेश आहे कि नाही याची खात्री करावी.

८. समाज सेवकांनी दारिद्रययादीपासून खरा दरिद्रय असलेला व्यक्ती अथवा कुटूंब वंचित राहू नये म्हणून काळजी घ्यावी.

९. तसेच दारिद्रय नसलेल्या व्यक्ती अथवा कुटूंबांना दारिद्रय निर्मूलनाचे लाभ मिळू नयेत म्हणून प्रयत्न करावेत.

थोडक्यात दारिद्रय नसलेल्या व्यक्ती व कुटूंबाची बोगस संख्या दर्शवून त्यांचा दारिद्रय निर्मूलनाच्या निधीतील, सवलतीतील सहभाग कमी करून वास्तविक जे दारिद्रय आहे पण दारिद्रयरेषेतील यादीत नाहीत त्यांना दारिद्रयरेषेतील यादीत समाविष्ट करून दारिद्रय निर्मूलनाच्या निधीतील, सवलतीतील लाभाचे भागीदार करण्याचा प्रयत्न समाजाने स्वतः पुढाकार घेऊन करावा ज्यामुळे द्रारिद्रयनिर्मूलन कार्यक्रमाला पूर्ण यश मिळेल.

थोडक्यात दारिद्रय ही समस्या केवळ शासकीय उपाययोजनांच्या माध्यमांतून अथवा वित्तीय अथवा मौद्रीक धोरनांच्या सवलतीद्वारे कमी होणारी नाही त्यासाठी समाजसहभागाची आवश्यकता आहे. म्हणजेच आर्थिक व सामाजिक दारिद्रय दूर होण्यासाठी समाजाचे नैतिक दारिद्रय दूर होणे आवश्यक आहे. म्हणजेच सामाजिक सहभागाशिवाय दारिद्रय निर्मूलन हे न संपनारे आव्हान आहे.

**आधार -**

१. भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक २०१४ - प्रतियोगीता दर्पन उपकार प्रकाशन दिल्ली.

२. तेंडूलकर समिती अहवाल.

28

# महिलांच्या दारिद्रय निर्मुलनात बचत गटाची भूमिका

**प्रा.डॉ.शंकर अंभोरे**
मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना

**प्रा.साबळे बालाजी आनंदा**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा

**प्रस्तावना :-**

दारिद्रय ही एक जागतिक समस्या आहे. या समस्येचे मुळे ससाधनांचे असमान वितरण हेच आहे. गरिबी म्हणजे अशी आर्थिक स्थिती की, जिवन जगण्यासाठी मुलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, याची पुर्तता न होणे. 'भारतात १९९३-९४ मध्ये दारिद्रयाचे प्रमाण ३७.५ टक्के होते. तर महाराष्ट्रामध्ये ३८.६ टक्के होते[१].'

हे दारिद्रय कमी करण्यासाठी प्रत्येक देशात सरकार व संस्थात्मक पातळीवर चालु होते. हे दारिद्रय कमी करण्यासाठी आर्थिक स्वावलंबन निर्माण करावे लागते. आर्थिक स्वावलंबन आल्याशिवाय आत्मसन्मान मिळत नाही. या बाबतीत तर जगातील सर्वच महिला पिछाडीवर होत्या. त्यांना मार्ग दाखविण्यासाठी महिलांना आत्मभान मिळवुन देण्यासाठी प्रत्येक देशात प्रयत्न होत होते. असेच प्रयत्न इ.स.१९९१ मध्ये भारतात व्हायला सुरूवात झाली. तसेच भारताचा शेजारील देश ' बांग्लादेशामध्ये महंमद युनुस यांनी आधुनिक बचत गट चळवळ उभारून महिलांचे दारिद्रय कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.[२]'

खेडयापाडयातील, वाडया वस्त्यातील अशिक्षित, अल्पशिक्षित बायकांना आम्हीही कोणीतरी आहोत ही ओळख निर्माण करून देण्याचे काम या बचत गटाच्या माध्यमातुन होत आहे. आज बचत गट चळवळ संपुर्ण भारतात पसरली आहे. अशा या बचत गट चळवळीचा अभ्यास करण्यासाठी संशोधक म्हणुन या विषयाची निवड केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :-**

१. दारिद्रय निर्मुलनात महिला बचत गटाचे योगदान अभ्यासणे.
२. बचत गटाच्या माध्यमातुन महिला आर्थिक स्वावलंबी होत आहेत काय ? याची पडताळणी करणे.

**संशोधनाची गृहीतके :-**

१. महिला बचत गटाच्या माध्यमातुन दारिद्रय निर्मुलन होत आहे.
२. बचत गटामुळे महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबन, आत्मसन्मान व आत्मभान निर्माण होत आहे.

**संशोधन पध्दती :-**

महाराष्ट्रात ४५ लाख कुटूंबे दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत. आत्तापर्यंत २ लाख ६३ हजार बचत गटाच्या माध्यमातुन २६ लाख कुटूंबे बचत गटाच्या कार्यकक्षेत आली आहेत. अद्यापही १८ लाख कुटूंबाना बचत गटापर्यंत आणने आवश्यक आहे. म्हणुन बचत गट चळवळीचा आणखी प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. त्या बरोबरच संशोधनात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे म्हणुन प्रस्तुत विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे. या सर्व बचत गटाचा अभ्यास करणे शक्य होणार नाही. म्हणुन मराठवाडा या विभागतील महिला बचत गट अभ्यासासाठी निवडलेले आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या आधारे तथ्यसंकलन केले असुन यादृच्छिक नमुना निवडीच्या आधारे मराठवाडयातुन ४० बचत गटातुन प्रत्येकी एक अशा ४० महिलांचा अनुसूचीच्या आधारे तथ्यसंकलित करून माहितीचे विश्लेषण केले आहे. तसेच विविध संदर्भग्रंथ, अहवाल, नियत कालिके यांचा अभ्यासासाठी अधार घेतलेला आहे.

**संशोधन पुर्व साहित्याचा अभ्यास :-**

स्वंयसहाय्यता गटाच्या माध्यमातुन महिलांच्या दारिद्रय निर्मुलनास गती प्राप्त झाली आहे. या संबंधी अनेक तज्ञांनी संशोधक अभ्यासकांनी अभ्यास करून आपल्या साहित्यातुन बचत गटाची आवश्यकता दारिद्रय निर्मुलनातील भूमिका विशद केली आहे. या संबंधी मोहन वैद्य म्हणतात, ' वास्तवीक बचत करणे हा महिलांचा स्थायीभावच आहे. रूपयातले दोन पैसे कसे वाचवावेत हे महिलांकडुनच शिकावे असे म्हटले जाते ते १०० टक्के खरे आहे. कोणत्याही वस्तुच्या खरेदी बाबत महिला जास्तीत जास्त चिकीत्सकपणे विचार करून मगच निर्णय घेतात हे अत्यंत योग्य आहे.[३]'

ग्रामीण भागात स्वंयसहाय्यता बचत गट एक चळवळ म्हणुन पुढे येत आहे. त्या संबंधी डॉ.मुलानी म्हणतात ' ग्रामीण भागात महिलांच्या सक्रीय सहभागात गावोगावी स्वंयसहाय्यता बचत गटाची चळवळ जोमाने वाढत आहे. बचत गटामुळे बचत संकलनाच्या कामाला चालना मिळवुन पतनिर्मीतीद्वारे रोजगार निर्माण होवुन ग्रामीण अर्थव्यवस्था मजबुत होत आहे.'[४]

बचत गटाची आवश्यकता विशद करताना, गुलाबराव ठाकरे ' बचत गट एक वरदान ' या त्यांच्या पुस्तकात म्हणतात, " गटाच्या स्थापनेचा उद्देश म्हणजे स्वंयसहाय्यता होय. स्वतःला स्वतः मदत करणे आपल्यावर आलेल्या संकटांना तोंड देताना दुसऱ्याकडे हात पसरण्याचा प्रसंग आपल्यावर येवु नये किंवा दुसऱ्याकडे यातना कराव्या लागु नये म्हणुन आपणच आपली मदत कशी करावी हे बचत गटामार्फत केले जाते. आपल्या जमा झालेल्या रकमेतुन सभासदांना पैश्याची गरज भासल्यास उदा. दवाखाना, मृत्यू, विवाह अशा वेळी ताबडतोब मदत आवश्यक असते."[५] यासाठीच बचत गट आर्थिक मदत करत असते.

**दारिद्रय निर्मुलन व बचत गटाची भूमिका :-**

' विविध योजनेतंर्गत आतापर्यंत १, ८८,१०१.५९ लाख रूपयाचे अनुदान देण्यात आले तर २, ४२,४५२.७७ लाख रूपयाचा कर्ज पुरवठा करण्यात आला. २, ६३,५३२ बचत गटातील १३, ६३,३६५ स्वंयराजगारींना त्याचा लाभ झाला आहे. या मधील ९०,०२१ स्वंयसहाय्यता बचत गटांनी स्वतःचे व्यवसाय सुरू केले आहेत. स्वर्णजयंती ग्रामस्वंयरोजगार योजनेअंतर्गत ३, ३९,६५२ अनुसूचित जातीच्या स्वंयरोजगारींना, २, ७५,६१९ अनुसूचित जमातीच्या स्वंयरोजगारींना, ६७,१८५ अल्पसंख्यांक स्वंयरोजगारींना, १०,०४७९० महिला स्वंयरोजगारी बरोबर १८२८६ अपंग स्वंयरोजगारींना या योजनेच्या माध्यमातुन लाभ देण्यात आला आहे.[६] '

महिला स्वंयसहायता गटांना ४ टक्के व्याजाने कर्ज पुरवठा करण्याचे व्यवस्था करण्यात आली आहे. आणि उर्वरीत ७ टक्के व्याज महाराष्ट्र शासन भरत आहे. त्यामध्ये आत्तापर्यंत सुमारे ५७०० बचत गटांना ४.३० कोटी रूपयांचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. योजनेमध्ये बचत गटाच्या संस्थात्मक मदतीसाठी गाव ते जिल्हा स्तरावर बचत गटाचे महासंघ स्थापन करण्यात येत आहे. आत्तापर्यंत ७५०० महासंघाची स्थापना झाली आहे. प्रत्येक जिल्हयात ग्रामीण विकास व स्वंयरोजगार प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली आहेत. केंद्र शासनाने आत्तापर्यंत अशा १६ प्रशिक्षण केंद्रांना मान्यता दिली असुन २८ केंद्रे चालु स्थितीत आहेत. त्यांच्या माध्यमातुन जवळपास ९००० प्रशिक्षणार्थींनी कौशल्यवृध्दीसाठी प्रशिक्षण घेतले आहे. बचत गटांना व्यापक बाजारपेठ प्राप्त व्हावी म्हणुन दरवर्षी विभागीय तसेच जिल्हास्तरावर बचत गटाच्या वस्तुंची प्रदर्शने भरविली जातात. या योजनेमधुन विभागीय प्रदर्शनासाठी प्रत्येकी २५ लाख रूपये, जिल्हा प्रदर्शनासाठी प्रत्येकी १० लाख रूपये या प्रमाणे निधी दिला जात आहे. त्याच बरोबर बचत गटांच्या उत्पादित मालांच्या विक्रीसाठी तालुका आणि जिल्हास्तरावर कायम स्वरूपी विक्रीकेंद्रे बांधण्याला शासनाने प्राधान्य दिले आहे. यासाठी प्रत्येक जिल्हा केंद्रासाठी ५० लाख रूपयांचा तर तालुका केंद्रासाठी २५ लाख रूपयांचा निधी देण्यात येत आहे. महाराष्ट्रात आठ जिल्हयातील १२९ तालुक्यातील अशी कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधण्यासाठी २००९ - १० मध्ये ३६२५ लाख रूपयांचा निधी देण्यात आला असुन त्याचे काम युध्दपातळीवर चालु आहे.

**महाराष्ट्रातील बचत गटाची स्थिती :-**

' महाराष्ट्र राज्यातील जवळपास ७६ टक्के बचत गट ग्रामीण भागात असुन २४ टक्के बचत गट शहरी भागात स्थापन झालेले आहे. तसेच एकुण बचत गटापैकी ८० टक्के बचतगट महिलांचे असुन २० टक्के बचतगट पुरूषांचे आहेत.[७]' म्हणजेच महिला सबलीकरणाची प्रक्रिया ग्रामीण भागात स्वंयसहायता गटाच्या माध्यमातुन चालु आहे. सर्व साधारणपणे बचतगटांची किमान सभासद संख्या १० ते १७ सभासद असुन कर्जवाटपामध्ये सरासरी २० ते ३०००० रूपये प्रत्येक महिला सभासदांना कर्ज मिळालेले आहे. महाराष्ट्रामध्ये २००६- ०७ पर्यंत ९०४७७ इतके महिला बचत गट स्थापन झाले होते. तर त्यांना कर्जवाटप २१३१८.५८ कोटी रूपये केले होते.

महाराष्ट्रातील विभागनिहाय बचत गट संख्येचा विचार केला तर सर्वात जास्त बचत गट विदर्भामध्ये स्थापन झाले असुन त्याचे प्रमाण ३९.७३ टक्के (३५९५१) दुसऱ्या क्रमांकावर पश्चिम महाराष्ट्र असुन त्या ठिकाणी ३३.१० टक्के (२९९३६) बचत गट आहेत त्यानंतर मराठवाडा १५.२३ टक्के (१३,७८१) बचत गट खानदेशामध्ये ७.५५ टक्के (६८२३) बचतगट, आणि कोकणात ४.४ टक्के (३९८६) बचतगट स्थापन झाले आहे. त्यांना कर्जवाटप अनुक्रमे विदर्भात ३९.४१ टक्के (८४०२.२२), पश्चिम महाराष्ट्र ३०.६७ टक्के (६५३८.७१) , मराठवाडा १७.१३ टक्के (३६५२.८३), खानदेश ८.७५ टक्के (१८६३.०३) आणि कोकण ४.०४ टक्के (८६१.७९) कोटी रूये इतके कर्ज वाटप करण्यात आले. यामुळे मराठवाडयातील महिलांचे दारिद्रय निर्मुलन होण्यास मदत होत आहे.

**मराठवाडयातील बचतगटांची स्थिती :-**

मराठवाडा विभाग हा विकासाच्या बाबतीत मागासलेला प्रदेश आहे. या विभागात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली,नांदेड, लातुर, उस्मानबाद व बीड असे ८ जिल्हे आहेत. २००६ -०७ पर्यंत एकुण बचत गटांची संख्या १३७८१ इतकी होती. तर त्यांना कर्जवाटप ३६५२.८३ कोटी रूपये इतके केले होते. स्वंयसहायता गटाच्या संख्येच्या बाबतीत मराठवाडयामध्ये सर्वाधीक बचतगट लातुर जिल्हयात १९.५० टक्के (२६८६)इतके असुन दुसऱ्या क्रमांकावर उस्मानाबाद जिल्हा १५.९० टक्के (२१९२), तिसऱ्या क्रमांकावर बीड जिल्हा १५.५७ टक्के (२६४७), चौथा क्रमांक नांदेड जिल्हा १४.९१ टक्के (२०५६) त्यानंतर औरंगाबाद १०.४१ टक्के (१४३५), परभणी जिल्हा १०.२६ टक्के (१४१३), जालना जिल्हा ८.६२ टक्के (११८०) आणि हिंगोली जिल्हा ४.८१ टक्के (६६३) इतके बचत गटांची संख्या आहे.

तसेच कर्ज वाटपाचे प्रमाण जिल्हानिहाय सर्वाधीक लातुर जिल्हयात ७२७.४८ कोटी रूपये १९.९१ टक्के झाले आहे तर उस्मानाबाद जिल्हा ५३४ कोटी रूपये १४.६१ टक्के, बीड जिल्हा ५२७.९१ कोटी रूपये १४.४५ टक्के , नांदेड जिल्हा ५३२.०६ कोटी रूपये १४.५६ टक्के, परभणी जिल्हा २०३.०३ कोटी रूपये १३.२० टक्के, औरंगाबाद जिल्हा ३३३.२१ कोटी रूपये ९.१२ टक्के , जालना जिल्हा ३१२.६७ कोटी रूपये ८.५५ टक्के, हिंगोली जिल्हा २०३.०३ कोटी रूपये ५.५५ टक्के अशा प्रकारे कर्ज वाटप झ ाालेले असुन बचत गटाच्या माध्यमातुन महिलांचे आर्थिक सक्षमीकरण केले जात आहे.

**निष्कर्ष :-**

१. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात बचत गटाची चळवळ समान प्रमाणात सक्रीय झालेली नसुन विकसीत भागात जास्त केंद्रीत झालेली आहे.
२. मराठवाडयातील जालना, हिंगोली, परभणी या मागास जिल्हयात बचत गटाचे आणि कर्ज वाटपाचे वितरण कमी झालेले असुन लातुर, बीड, उस्मानाबाद व नांदेड या जिल्हयात बचत गट व कर्ज वाटप यांचे प्रमाण जास्त आहे.
३. हिंगोली व जालना या मागास जिल्हयात बचतगटाचे प्रमाण व कर्ज वाटपाची रक्कम उद्दिष्टानुसार वाढलेली नाही.
४. महाराष्ट्रात आणि मराठवाडयात महिला बचत गटांची संख्यात्मक वाढ मोठया प्रमाणात झाली असली तर गुणात्मक वाढ पाहिजे त्या प्रमाणात झालेली नाही. त्यामुळे स्वंयरोजगार निर्माण करणारे व्यवसाय मोठया प्रमाणात सुरू झालेले नाही. म्हणुन दारिद्रय निर्मुलनात अडसर निर्माण झाला आहे.
५. स्वंयसहायता गटामुळे महिला बचतीतुन मोठी रक्कम जमा करून अंतर्गत कर्ज किंवा बँकांचे कर्ज घेवुन छोटेछोटे व्यवसाय करत आहेत. त्यातुन त्यांना रोजगार प्राप्त होत आहे. या उत्पन्नातुन महिला आपल्या कुटूंबाच्या समस्या सोडवित आहेत.
६. आज ग्रामीण भागातील महिला बचत गटाद्वारे एकत्र येवुन आर्थीक बाबतीत स्वावलंबी होत आहेत. पैशाची बचत करणे एवढेच बचतगटाचे उद्दिष्ट नसुन उपेक्षित महिलांच्या हाताला काम व स्व मिळकतीतुन आत्म सन्मान मिळवुण देणे हे आहे.

**उपाय योजना :-**

बचतगट चळवळ अधिकाधिक चांगली होण्यासाठी शासन, संस्था यांनी काही उपाय अंमलात आणले तर त्याचा निश्चितच फायदा होईल असे वाटते. या संबंधी काही उपाययोजना पुढीलप्रमाणे सुचविता येतात.

१) भारतीय लोकसंख्येचा विचार करता दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे. या गरीब लोकांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारायची असेल तर बचत गट अधिक जोमाने उभे करणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
२) दारिद्रयामुळे निरक्षर , अज्ञानी, अंध श्रध्दाळु, दैववादी व व्यसनाधिनतेची समस्या निर्माण झालेली आहे. या समस्येतुन मार्ग काढण्यासाठी बचतगट चळवळ अधिक चांगल्याप्रकारे राबविणे आवश्यक आहे.
३) बचतगटातील महिलांना कौशल्यवृध्दीसाठी प्रशिक्षण, विक्रीकला, निर्णय क्षमता, व्यवस्थापन कौशल्य इ.साठी मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.

४) बचतगटांना कर्ज देवुन गरीब लोकांपर्यंत कर्जाचे फायदे मिळावेत यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक व नाबार्ड यांनी सर्व बँकाना मार्गदर्शक सुचना देवुन निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करावा.
अशा प्रकारे वरिल उपाययोजना अंमलात आणल्यास दारिद्रय निर्मुलनात बचत गट प्रभावीपणे भूमिका निभावतील.

**संदर्भग्रंथसुची :-**


१. डॉ.रेणु त्रिपाठी - ग्रामीण विकास और निर्धनता उन्मुलन - २०११ ओमेगा पब्लिकेशन्स नई दिल्ली पृष्ठ क्र.८३
२. डॉ.माधव गायकवाड - ' महाराष्ट्रातील स्वंयसहायता बचत गटाची वाटचाल एक अभ्यास - फेब्रुवारी २०१२ अर्थ विचार वर्ष -२ खंड १ पृष्ठ ३८ '
३. वैद्य मोहन वसंत - महिला बचत गट हस्तपुस्तिका, २००५
४. डॉ.मुलानी एम.यु. - महिला स्वंयसहायता बचत गट , डायमंड पब्लिकेशन टिळक रोड पुणे २००६
५. ठाकरे गुलाबराव - बचत गट एक वरदान, सरस्वती बुक कंपनी मुंबई २००६
६. प्रमोद नलावडे - बचत गटाची किमया , लोकराज्य अंक १ वर्ष ६४ एप्रिल २०१२ पृष्ठ ६०
७. Drusti - Stree Adhyayan Prabodhan Kendra , २००७ An Evalutioan of impact of SHG on the social Empowerment of women in Maharashtra , National Commission for women New Delhi - Page २१ -३०